# ग्रीनलॉन्स विदयालय

**दिनांक - ५-३-२०२६ FINAL EXAMINATION (2026) वेळ - २ तास**

**इयत्ता - ८ वी - अ,ब,क**

# मराठी

**मार्क - ८०**

**INSTRUCTIONS:-** **1.This paper comprises of two sections. Section A and B.**
**2. Section A answers must be written on the answer sheet.**
**3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet**

## विभाग - "अ" [४० मार्क]

प्रश्न १. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

मुंबईच्या परळ भागात एक इस्पितळ आहे. ते आहे जनावरांचं इस्पितळ. ते आतून बघायचं असं माझ्या मनात खूप दिवसांपासून होतं. एकदा तो योग आला. कमानीच्या आत तर सहज प्रवेश मिळाला. उजवीकडं एक छोटीशी इमारत दिसते. हे बहुधा कार्यालय असावं. कार्यालयाच्या दाराशीच भिंतीवर एक मोठी तसबीर आहे. त्या तसबिरीत बैल, घोडा, कुत्रा, मांजर, शेळी अशी वेगवेगळ्या जनावरांची चित्रं आहेत. खाली एक छोटंसं पण मनाला भिडणारं वाक्य आहे, 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का?'

मला इस्पितळ बघण्याची परवानगी मिळते,इतकंच नाही तर मला सारं इस्पितळ नीट दाखवण्यासाठी भरत नावाचा एक छोटा चुणचुणीत मुलगाही ते माझ्याबरोबर देतात. बाई हा आहे मांजरांचा विभाग आपल्या स्वयंपाक घरातले ओटे जेवढ्या उंचीचे असतात तेवढ्या उंचीचे कट्टे आणि त्यांच्याखाली एकेरी जाळीने विभागलेले छोटे छोटे खण. प्रत्येक मांजरांजवळ दोन बश्या आहेत. एक खादयपदार्थांसाठी व दुसरी पाण्याची.

मी जाळीच्या छिद्रांतून बोट घालून कुणाचं डोकं खाजवते. कुणाचा गळा खाजवते तर कुणाचे कान कुरवाळते. मांजरं खूष होतात. पोटांतून 'गुर्रगुर' आवाज काढून समाधानाची पावती देतात.आता माझं लक्ष एका गोष्टीकडं जातं. प्रत्येक मांजराच्या कप्प्यामध्ये त्याचं नाव लिहिलेलं आहे. 'जॅक जाधव', 'बकुल गोखले', 'सॅमी डिकुन्हा', 'रोमल टिपणीस'. जाधव, गोखले, डिकुन्हा, टिपणीस ! मांजरांना दिलेली त्यांच्या मालकांची आडनावं !

त्या जाधव, गोखले, टिपणीस इत्यादी मंडळींचा डोळ्यांनी निरोप घेऊन मी बाहेर पडते. मला निरोप देताना पुन्हा एकदा 'मियाँव'चा गजर करतात. भेटीला आलेला माणूस परत जायला निघाला म्हणजे इस्पितळाच्या पेशंटच्या चेहऱ्यावर जी खिन्नता दिसते, तीच या मांजरांच्या चेहऱ्यावर मला दिसली. घरी लाड करून घ्यायची सवय झालेल्या या मांजरांना इथं विलक्षण एकटं एकटं वाटत असलं पाहिजे.

"या मांजरांना औषधपाणी माणसांसारखं करतात का रे?' मी भरतला विचारलं. "तर तर!" असं म्हणून भरत सांगतो, "त्यांचं खाणंपिणं पथ्याचं असतं, बाई." एकदम भरतला काहीतरी आठवतं, तो मला म्हणतो, "बाई, शेजारी कुत्र्यांचा विभाग आहे, तिथं जाऊ या जरा."

आम्ही शेजारच्या विभागात जातो. एक भली दांडगी अतिशय देखणी कुत्री तिथं निजलेली दिसली. जवळच एका टोपलीत तिची बरीच पिलं आहेत. अजून डोळेही न उघडलेल्या त्या पिलांच्या अंगावरून मी हलकेच बोटं फिरवते. त्यांची आई तपकिरी रंगाची आहे, पण पिलं पांढरी, काही ठिपक्याठिपक्यांची आहेत. सावरीच्या कापसाचे जणू मऊमऊ गोळेच! इवले कान, इवल्या शेपट्या, लालसर ओली नाकं आणि पोटांतून येणारा 'कुई कुई' आवाज. कितीतरी वेळ मी त्यांच्याकडं बघतच राहिले.

प्रश्न :-

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [४]

१. निरोप देताना मांजरी कशाचा गजर करतात?

२. कुत्रीच्या पिलांचे वर्णन लेखिकेने कसे केले आहे?

३. तसबिरीत कोणत्या जनावरांची चित्रं आहेत?

४. प्रत्येक मांजरांजवळ दोन बश्या कशासाठी आहेत?

**कृती २.** खालील प्रश्नांची दोन- तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. मांजरांना कोणकोणती नावे दिली आहेत?

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. मांजरांना इथं ------------------------- एकटं एकटं वाटत असलं पाहिजे.

२. ---------------------- कापसाचे जणू मऊमऊ गोळेच!

**कृती ४.** योग्य समानार्थी शब्द लिहा. [१]

( छोटे, राग, मोठे, वेळ )

१. लहान - ------------------------------ २. योग - ---------------------------------

**कृती ५.** वचन बदला. [२]

१. इमारती - ---------------------- २. जाळ्या - ----------------------------

३. पावत्या - ---------------------- ४. टोपल्या - ---------------------------

प्रश्न २अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ५) ANY 5** [५]

१. दुकानदाराने पाण्याच्या बाटलीची किंमत किती सांगितली?

२. ईशानच्या मित्रांची नावे काय आहेत?

३. झिलमिलणारे कोण आहेत?

४. भरकटलेल्या जगात काय नाही आहे?

५. संतांचे दर्शन झाल्यावर कवीला काय वाटते?

६. संतांना कवी काय मानतो?

७. आम्ही हवे आहोत का? या पाठाच्या कवयित्री कोण आहेत?

प्रश्न २ब) खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ३) ANY 3** [६]

१. गिर्यारोहणाच्या रोमांचक अनुभवात ईशानने बघितलेल्या नैसर्गिक गोष्टी कोणत्या?

२. ईशानाला कंटाळा आलेल्या व गोडी न वाटणाऱ्या गोष्टी कोणत्या?

३. "आजि दिवाळी दसरा" असे संत सेना महाराज का म्हणातात?

४. नदी सागराकडे वाहून काय शिकवते?

प्रश्न ३ खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. **( ANY 1)** [५]

१. आजी / आजोबांना तब्येतीची चौकशी करणारे पत्र लिहा.
(Write a letter to your grandmother / grandfather enquiring about their health.)

२. शाळेच्या मुख्याध्यपिकांना नवीन क्रीडा साहित्य मागणीसाठी पत्र लिहा.
(Write a letter to the principal of your school requesting new sports equipment.)

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. **( ANY 1)** [६]

१. माझा गिर्यारोहणाचा अनुभव
**मुददे** - ठिकाणाचे नाव - कसे गेलात - कोणासोबत गेलात - काय तयारी केली - एक अविस्मरणीय प्रसंग.

२. वेळेचे महत्त्व
**मुददे** - वेळेचे फायदे - वेळेचे तोटे - तुम्ही वेळेचा काय उपयोग कराल - संदेश काय दयाल.

३. माझा आवडता ऋतू
**मुददे** - ऋतूचे नाव - कोणत्या महिन्यात येतो - ऋतूचे वर्णन - ऋतूतील सण - तुम्हाला का आवडतो.

प्रश्न ५ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

कलकत्ता नावाच्या फार मोठ्या शहरामध्ये दत्त नावाचे कुटुंब राहत होते. विवेकानंदांच्या वडिलांचे नाव विश्वनाथ होते. विवेकानंदांच्या आईचे नाव भुवनेश्वरी होते.

१२ जानेवारी १८६३ रोजी विवेकानंदांचा जन्म झाला. या मुलाचे नाव 'वीरेश्वर' ठेवण्यात आले. त्याला प्रेमाने सर्वजण 'बिले' म्हणत. पण अन्नप्राशनाच्या वेळी त्याचे नाव नरेंद्रनाथ असे ठेवण्यात आले.बिले मोठा झाल्यावर सर्वजण त्याला नरेंद्रनाथ म्हणू लागले.नरेंद्र नेहमी सत्य बोलत असे. त्याचे अंतःकरण अतिशय शुद्ध व पवित्र होते. तो रामकृष्णांचा शिष्य झाला. नरेंद्र बी.ए.च्या परीक्षेचा अभ्यास करीत होता व त्याच वेळी प्रसिद्ध वकील निमाईचरण बसू यांच्याजवळ कायदयाचे शिक्षणही घेत होता.

एके दिवशी रामकृष्णांनी आपल्या शिष्यांना हाती झोळी घेऊन भिक्षा मागून आणण्यास सांगितले. भिक्षेत मिळालेल्या अन्नाचा कालीमातेला नैवेदय दाखविण्यात आला व तो प्रसाद सर्वांनी आनंदाने खाल्ला. त्यानंतर रामकृष्ण देवांनी सर्वांना कपडे दिले. सर्वांनी आपली नावे

बदलली. नरेंद्र दत्त 'स्वामी विवेकानंद' झाले. रामकृष्ण विवेकानंदांना म्हणाले, "तुला जगाचा उद्धार करावयाचा आहे.



मी तुला माझ्याजवळचे सारे आध्यात्मिक ज्ञान दिले आहे. तू सगळ्या जगाला ईश्वराचे महत्त्व समजावून दे. ईश्वरावर प्रेम करायला शिकव. तू दीनदुबल्या लोकांना मदत कर. त्यांना आधार दे. रामकृष्णणांचा आजार वाढला. डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश आले नाही. शिष्यांनी मनोभावे सेवा केली.

इंग्लडमध्ये स्वामीजींना 'कुमारी मार्गरिट नोबल' नावाची शिष्या भेटली. तिचे नाव त्यांनी 'भगिनी निवेदिता' असे ठेवले. स्वामीजींनी भारतीयांना शरीर सुदृढ बनवण्याचा, स्वावलंबनाचा संदेश दिला. स्वामीजींनी भारतीयांना "दुःखी माणसावर प्रेम करा, तुमच्याकडे दृढ इच्छाशक्ती व स्वतःल योग्य वाटेल तेच करण्याचे धैर्य असले पाहिजे" अशी शिकवण दिली. स्वामीजींनी आपल्या मतांच्या प्रचारासाठी कलकत्त्याजवळ गंगा नदीच्या काठी 'बेलूर मठ' बांधला.

प्रश्न :-

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. विवेकानंदांचा जन्मदिवस व वर्ष कोणते?

२. स्वामीजींनी आपल्या मतांच्या प्रचारासाठी काय बांधला?

३. स्वामीजींनी भारतीयांना काय संदेश दिला?

**कृती २.** खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. स्वामीजींनी भारतीयांना कोणती शिकवण दिली?

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. विवेकानंदांच्या आईचे नाव ------------------------- होते.

२. प्रसिद्ध वकील ------------------------- बसू यांच्याजवळ कायदयाचे शिक्षणही घेत होता.

**कृती ४.** योग्य समानार्थी शब्द लिहा. [१]

( बलवान, सुदृढ, शांतता, धैर्य )

१. सशक्त - ---------------------- २. धीर - ------------------------------

**कृती ५.** योग्य विरुद्धार्थी शब्द लिहा. [१]

( प्रेम, राग, दुःखी, सुखी )

१. द्वेष X ------------------------- २. आनंदी X ----------------------------

**दिनांक - ५-३-२०२६ ग्रीनलॉन्स विदयालय इयत्ता - ८ वी - अ,ब,क**

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

**नाव -** ---------------------------------------------------------------------- **हजेरी क्र. -** -----------------------

**विभाग – "ब"** **[४० मार्क]**

प्रश्न १ खालील दिलेल्या कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]

| परल, गंगेला आंधळी, पोहण्याचा, राष्ट्रपतींकडे, गिर्यारोहणाचा, बहिरी, परळ, राष्ट्रपतीकडे, गंगोत्रीला |
|---|

१. जन्मापासून --------------------------- आहे ती!

२. मुंबईच्या -------------------------- भागात एक इस्पितळ आहे.

३. या मुलांना वीरपदक मिळावे म्हणून ------------------------------ शिफारस केली.

४. अनेक तासांच्या कठीण आणि थकवणाऱ्या चढाईनंतर शेवटी ते ------------------------ पोहचले.

५. वास्तविक ईशानाला ------------------------------ विशेष छंद होता.

प्रश्न २ खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा. [३]

| पाटीवरून मारणे, सामील होणे, अडचन होने, दुःख सोसणे, कष्ठ करणे, पाठीवरून हात फिरवणे, प्रेम करणे, दुःख होणे, खुप कष्ट करणे, अडचण होणे, सामिल होणे, प्रेम दाखवणे. |
|---|

१. सहभागी होणे - ----------------------------------- २. जीव लावणे - ----------------------------------------

३. गैरसोय होणे - --------------------------------------- ४. घाव सोसणे - ---------------------------------------

५. थोपटणे - -------------------------------------------- ६. राबणे - ---------------------------------------------

प्रश्न ३ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. शिक्षक विदयार्थ्यांना धडा शिकवत आहेत.

उत्तर - नाम - ------------------------------------- नामाचा प्रकार - -----------------------------------------------

२. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे.

उत्तर - नाम - ----------------------------------- नामाचा प्रकार - ------------------------------------------------

३. आपल्यात प्रामाणिकपणा असावा.

उत्तर - नाम - ------------------------------------ नामाचा प्रकार - ------------------------------------------------

प्रश्न ३ ब) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा. [३]

१. ज्याला जे हवे आहे, त्याला ते मिळेल. सर्वनाम - ----------------------------------------------

२. भांडणाने कोणताच प्रश्न सुटणार नाही. सर्वनाम - ----------------------------------------------

३. सहलीला आपण कोठे जायचे? सर्वनाम - ----------------------------------------------

प्रश्न ३ क) खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. मंदिराबाहेर काही भिकारी भीक मागत होते.

उत्तर - विशेषण - -------------------------------- विशेषणाचा प्रकार - ----------------------------------------

२. सर्व रस्ते पाण्याने तुडुंब भरले होते.

उत्तर - विशेषण - -------------------------------- विशेषणाचा प्रकार - ----------------------------------------

३. ते सर्व शहरात राहतात.

उत्तर - विशेषण - -------------------------------- विशेषणाचा प्रकार - ----------------------------------------

प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [३]

| |
|---|
| दारारा, मोजणी, त्रास्त, कुशलता, गुन्हा, अखंड, दरारा, कुशन, त्रस्त, गून्हा, मोजनी, अखन्ड |

१. कौशल्य - ------------------------------------ २. वचक - ---------------------------------------

३. हैराण - ---------------------------------------- ४. कसूर - ---------------------------------------

५. गणना - --------------------------------------- ६. अभंग - ---------------------------------------

प्रश्न ४ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [३]

| |
|---|
| दुश्काळ,अविचारीं, दूय्यम, खरखरीत,स्पष्ठ, मंजूळ, दुष्काळ, दुय्यम, स्पष्ट,मंजुळ,अविचारी, खरखरित |

१. मऊमऊ X ----------------------------------- २. धूसर X ----------------------------------------

३. विचारी X -------------------------------------- ४. सुकाळ X -------------------------------------

५. कर्कश X --------------------------------------- ६. मुख्य X ----------------------------------------

प्रश्न ४ क) खालील शब्दांचे वचन बदला. [३]

१. चोपडी - --------------------------------------- २. सत्कार्य - --------------------------------------

३. दुरुस्ती - --------------------------------------- ४. शेंगदाणा - -------------------------------------

५. दिवा - ------------------------------------------- ६. खांदा - -----------------------------------------

प्रश्न ४ ड) खालील शब्दांचे लिंग बदला. [३]

१. सम्राट - ------------------------------------------ २. पुतण्या - ----------------------------------------

३. संशोधक - -------------------------------------- ४. सेवक - ------------------------------------------

५. अधिकारी - ------------------------------------- ६. शेठ - --------------------------------------------

प्रश्न ५ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा. [३]

| |
|---|
| वीनंति, समुद्र, संपूर्ण, नीश्चय, मनोवेधक, वृषभ, निश्चय, विनंती, मनोवेदक, वृषब, समूद्र, सगळा |

१. हौसले - ---------------------------------------- २. सागर - -----------------------------------------

३. रोमांचक - -------------------------------------- ४. बैल - -------------------------------------------

५. आवाहन - --------------------------------------- ६. अवघा - ----------------------------------------

प्रश्न ५ ब) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा. (make sentences using these words) [३]

१. वृक्ष (Tree) - ----------------------------------------------------------------------------------------------------

२. प्रवाह (Force) - ------------------------------------------------------------------------------------------------

३. प्रशिक्षण ( Training)- -----------------------------------------------------------------------------------------

प्रश्न ५ क) खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा. [३]

१. बिस्कीट, बिस्किट, ब्रीस्कीट, बिस्किटं - ------------------------------------------------------

२. अथांगता, अथागता, अथाणगत, अथानगता - ------------------------------------------------------

३. गलेलठ, गलेलठठ, गेलेलठ, गेलेलठ - ------------------------------------------------------

४. व्याकूळ, व्याकुळ, व्याकुल, व्यंकूल - ------------------------------------------------------

५. उतसह, ऊत्साह, उत्साहं, उत्साह - ------------------------------------------------------

६. देखिले, देखिलें, देखिल, देखिला - ------------------------------------------------------

प्रश्न ५ ड) खालील विरामचिन्हांच्या योग्य जोड्या लावा. [२]

| क्र. | विरामचिन्हे | उत्तर | चिन्हांची नावे |
|---|---|---|---|
| १. | ( , ) | ------------------------------------------------ | प्रश्नचिन्ह |
| २. | ( ! ) | ------------------------------------------------ | स्वल्पविराम |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | ( ? ) | ----------------------------------------------------------- | अपूर्णविराम |
| ४. | ( : ) | ----------------------------------------------------------- | उदगारचिन्ह |